# मोटार वाहन विभाग, महाराष्ट्र शासन

## मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरणाच्या कार्यक्षेत्रातील टॅक्सी परवान्यांच्या वाटपासाठी जाहिरात - २०१४

मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरणाच्या कार्यक्षेत्रातील नुतनीकरण न झालेले/ रद्द / व्यपगत टॅक्सी परवान्याचे वाटपासाठी इच्छुक व पात्र अर्जदारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

**ऑनलाईन अर्ज भरण्याचे वेळापत्रक**

१) ऑनलाईन अर्ज भरण्याची सुविधा दिनांक ०६.०९.२०१४ दुपारी ०३.०० ते दिनांक २०.०९.२०१४ रोजी सांयकाळी ०६.०० पर्यंत उपलब्ध.

२) ऑनलाईन पेमेंट सुविधा दिनांक ०६.०९.२०१४ दुपारी ०३.०० पासून ते दिनांक २२.०९.२०१४ रोजी दुपारी ०२.०० वाजेपर्यंत उपलब्ध.

**ऑनलाईन अर्ज प्रक्रिया शुल्क रूपये १००/- (विनापरतावा)**

**वाटप करावयाच्या परवान्यांची संख्या - ७८४३**
**टिप :- उपरोक्त नमूद परवाना संख्येत बदल होऊ शकतो.**

**I. पात्रतेचे निकष**

१. अर्जदार भारतीय नागरिक असला पाहिजे.
२. वयोमर्यादा :- अर्ज सादर करावयाच्या दिवशी अर्जदाराचे वय २० वर्षापेक्षा जास्त असणे आवश्यक आहे.
३. शैक्षणिक अर्हता :- अर्जदार किमान १० वी इयत्ता उत्तीर्ण असावा. जर पुरेशा संख्येने, किमान १० वी इयत्ता उत्तीर्ण अर्जदारांकडून अर्ज प्राप्त झाले नाहीत तर ८ वी इयत्ता उत्तीर्ण उमेदवारांचा विचार करण्यात येईल.

**II. सर्वसाधारण अटी व शर्ती खालीलप्रमाणे असतील–**

१. अर्जदार मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरणाच्या कार्यक्षेत्रातील रहिवाशी असावा आणि त्याच्या वाहन चालक अनुज्ञप्तीमध्ये सध्या रहात असलेल्या ठिकाणचा पत्ता नोंद असावा. यशस्वी अर्जदारांना तो रहात असलेल्या ठिकाणच्या कार्यक्षेत्रातील परिवहन कार्यालयाकडून परवाना जारी करण्यात येईल. परवाना संपूर्ण मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरणाच्या कार्यक्षेत्रात वैध राहील. उदा. पनवेल शहरात रहाणा-या अर्जदाराकडे पनवेलचा पत्ता नमूद असलेली व प्रादेशिक परिवहन कार्यालय, पनवेल यांनी जारी केलेली अनुज्ञप्ती व बॅज असणे आवश्यक आहे. सदर अर्जदारास पनवेल कार्यालयाकडून संपूर्ण मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरणाच्या कार्यक्षेत्रात वैध असलेला टॅक्सी परवाना जारी करण्यात येईल. मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरणाचे कार्यक्षेत्र म्हणजे मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण अधिनियम १९७४ च्या अनुसूची (१) मध्ये अनुसूचीत केलेले क्षेत्र
२. अर्ज करण्याच्या दिनांकास अर्जदाराकडे हलके मोटार वाहन (परिवहन) किंवा परिवहन वाहन (HGV/HPV) ची वाहन चालक अनुज्ञप्ती तसेच सार्वजनिक सेवा वाहनाचा (ऑटोरिक्षा अथवा टॅक्सी ) बॅज असणे आवश्यक आहे.
३. अर्जदारास स्थानिक भाषेचे (मराठी) ज्ञान तसेच स्थानिक क्षेत्राचे भौगोलिक ज्ञान असणे आवश्यक आहे.
४. अर्जदाराचे महाराष्ट्र राज्यात किमान १५ वर्षे सातत्याने वास्तव्य असले पाहिजे.
५. यशस्वी अर्जदारास त्याच्या वास्तव्याच्या क्षेत्रातील संबंधीत पोलिस ठाण्याचे, अर्जदारावर किमान मागील एक वर्षात कोणताही दखलपात्र गुन्हा नोंद नसल्याचे प्रमाणपत्र, सादर करावे लागेल.
६. यशस्वी अर्जदारास तो/ती सरकारी/निमसरकारी, खाजगी कंपनी अथवा संघटित क्षेत्रातील कोणत्याही संस्थेत/ उद्योगात नोकरी करत नसल्याचे प्रतिज्ञापत्र सादर करावे लागेल.
७. यशस्वी अर्जदाराकडे त्याच्या नावे ऑटोरिक्षा/टॅक्सीचा परवाना नसल्याचे प्रतिज्ञापत्र सादर करावे लागेल.
८. कोणत्याही संवर्गासाठी अथवा व्यक्तीसाठी आरक्षण ठेवण्यात आलेले नाही.

## III. परवान्यांवर चालवावयाच्या टॅक्सीबाबत.

१. परवान्यावर नोंद करावयाचे वाहन मुंबई शहर व लगतचे क्षेत्र जेथे सी.एन.जी. पंप उपलब्ध आहे तेथे सी.एन.जी इंधनावर चालणारे व इतर क्षेत्रात एल.पी.जी/पेट्रोल इंधनावर चालणारे असावे.
२. टॅक्सीमध्ये सर्व प्रवाशांना स्पष्टपणे दिसेल अशा ठिकाणी मान्यता प्राप्त इलेक्ट्रोनिक मीटर प्रिंटरसह असणे बंधनकारक आहे.
३. परवान्यावर नोंद होणारी टॅक्सी ही नवीन असली पाहिजे.
४. परवान्यावर नोंद होणा-या टॅक्सीसाठी, भविष्यात शासन/परिवहन आयुक्त/संबंधीत प्राधिकरण हे जी.पी.एस./जी.पीआर.एस., आर.एफ.आय.डी.टॅग, टॅकोमीटर व रुफ टॅाप इंडिकेटरचा वापर / जोडणी करणे परवाना धारकास बंधनकारक करू शकतील व परवानाधारकांस ते स्वखर्चाने बसवावे लागेल.
५. अर्जदाराने एकापेक्षा जास्त अर्ज दाखल केल्यास असे सर्व अर्ज रद्द समजण्यात येतील.
६. आर.टी.ओ. तक्रार (टोल फ्री) क्रमांक. तसेच पोलीस व महिला हेल्पलाईन क्रमांक सर्व प्रवाशांना स्पष्टपणे दिसतील अशा ठिकाणी प्रदर्शित करणे आवश्यक आहे.
७. परवान्याची तसेच वाहन चालकांच्या अनुज्ञप्तीची रंगीत छायाप्रत सर्व प्रवाशांना स्पष्टपणे दिसतील अशा ठिकाणी प्रदर्शित करणे आवश्यक आहे.

## IV. अर्ज करण्याची पध्दत :-

१. प्रस्तुत जाहिरातीद्वारे वितरित करावयाच्या टॅक्सी परवान्यांच्या सोडतीसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.
२. पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड (Web-Based) ऑनलाईन अर्ज https://taxipermit.mahaonline.gov.in या वेबसाईटद्वारे, दिनांक ०६ सप्टेंबर २०१४ रोजी दुपारी ०३.०० ते दिनांक २० सप्टेंबर २०१४ रोजी सायंकाळी ०६.०० या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील.
   २.१ पात्र अर्जदारांमधून लॉटरी पध्दतीने यशस्वी अर्जदाराची निवड केली जाईल. यासाठीची लॉटरी सोडत दिनांक १० ऑक्टोंबर २०१४ किंवा अन्य दिवशी काढण्यात येईल.
   २.२ सोडतीचा निकाल १० ऑक्टोंबर २०१४ रोजी किंवा अन्य दिवशी परिवहन विभागाच्या तसेच महाऑनलाईनच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केला जाईल.
   २.३ यशस्वी अर्जदारानी त्यांची आवश्यक कागदपत्रे, पडताळीसाठी, निकाल लागल्यानंतर संबेंधीत प्रादेशिक / उप प्रादेशिक परिवहन कार्यालयांत दिनांक ३१ ऑक्टोंबर २०१४ पर्यंत सादर करणे आवश्यक राहील संबंधीत परिवहन कार्यालयातून यशस्वी अर्जदारांनी सादर कलेल्या मूळ कागदपत्रांची छाननी करून टॅक्सी परवान्यासाठीची इरादापत्रे वाटपाचे काम दिनांक १३ ऑक्टोंबर २०१४ पासून केले जाईल
३. ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना https://taxipermit.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.
४. विहीत पध्दतीने ऑनलाईन अर्ज सादर करताना प्रक्रिया शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.
५. प्रकिया शुल्क खालील पध्दतीने भरता येईल :-
   १) नेट बँकिंग २) डेबिट कार्ड
   ३) क्रेडीट कार्ड ४) संग्राम केंद्र /सीएससी (नागरीक सेवा केंद्र)
६. www.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर संग्राम केंद्र (ग्रामपंचायती) आणि सीएससी सुची (यादी) उपलब्ध आहे.
७. अर्ज नमूना मराठी किंवा इंग्रजी मध्ये उपलब्ध असून त्यासंबंधीचे पर्याय screen वर उपलब्ध आहेत.
८. अर्जदाराने त्याचा राहण्याचा संपूर्ण पत्ता पिनकोडसह काळजीपूर्वक टाईप करावा / भरावा.
९. संपर्क तपशिलामध्ये अचूक भ्रमणध्वनी क्रमांक (मोबाईल फोन) देणे बंधनकारक आहे.
१०. अर्जदाराकडे पॅनकार्ड असल्यास तसेच आधारकार्ड असल्यास अथवा त्यासाठी अर्ज केला असल्यास त्याचा क्रमांक नोंदविणे बंधनकारक आहे.

११. अर्जाच्या शेवटी दर्शवलेली प्रतिज्ञा वाचून **“मला मान्य आहे” (I agree)** समोरील चौकटीमध्ये क्लीक करावे.

१२. OTP (One Time Password) अर्जदाराच्या भ्रमणध्वनी क्रमांकावर (मोबाईल फोन) पाठविण्यात येईल. OTP (One Time Password) ची खात्री करणे बंधनकारक आहे.

१३. अर्ज भरल्यानंतर अर्ज पुन्हा तपासून घ्यावा. सर्व माहिती बरोबर असल्याची खात्री झाल्यास “अर्ज दाखल करावा” (submit) या बटनावर क्लीक करावे.

१४. त्यानंतर प्रक्रिया शुल्क “Pay now” वर क्लीक करावे.

**V.** अर्ज स्विकारण्यासाठी केवळ महाऑनलाईन या संस्थेची परिवहन विभागाने नेमणूक केली आहे. इतर कोणाही व्यक्तीची / संस्थेची नेमणूक केलेली नाही. अर्जदारांनी कोणाही अनधिकृत व्यक्तीचे प्रलोभनास बळी पडू नये. तसे केल्यास परिवहन विभाग जबाबदार राहणार नाही.

**VI.** दिनांक २० सप्टेंबर २०१४ रोजी सायंकाळी ०६.०० वाजेनंतर प्राप्त झालेले अर्ज सोडतीसाठी विचारात घेतले जाणार नाहीत.

**VII.** अर्जदाराने अर्जामध्ये विचारलेली माहिती मुद्दामहून चुकीची दिल्याचे अर्ज तपासणीमध्ये आढळल्यास असे अर्ज रद्द ठरविण्यात येतील. तसेच अशा अर्जदारांवर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

**VIII.** अधिक माहितीसाठी हेल्पलाईन नंबरवर ०२२ –६१३१६४००, कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी :- वेळ सकाळी ०९.३० ते रात्री ०९.३० व सुट्टीच्या दिवशी सकाळी ०९.३० ते संध्याकाळी ०६.३० या वेळेत संपर्क साधता येईल.

**दिनांक :-०४ सप्टेंबर २०१४**
**स्थळ :- मुंबई.**

**-सही-**
**सचिव,**
**मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरण**